नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २४५ Issue - 245 | वार मंगळवार दि. २१ जानेवारी २०२५ Blow- Tuesday Date 21 January 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### अमेरिकेत पुन्हा डोनाल्ड ट्रम्प पर्व, ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून घेतली शपथ



वाशिंग्टन : अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी शपथ घेतली आहे. त्यामुळे पुन्हा एकदा अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प पर्व सुरु झालं आहे. अमेरिकेचे मावळते राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी ट्रम्प यांच्याकडे अध्यक्षपदाची सूत्रं दिली. त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतली. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वेळेनुसार रात्री १०.३० वाजता शपथ घेतली. अनेक दशकांनी पहिल्यांदाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची शपथ ही अमेरिकेच्या संसदेत पार पडली. कारण अमेरिकेत कडाक्याची थंडी आहे. त्यामुळे अमेरिकेन संसदेत या शपथविधी सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. पती डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी आलेल्या मेलेनिया ट्रम्प यांनी न्यूयॉर्कहून डिझाईन करण्यात आलेला खास ड्रेस परिधान केला होता. मेलेनिया यांचा हा खास ड्रेस रॉल्फ लॉरेन यांनी डिझाईन केला होता. तसंच या खास ड्रेसवर मेलेनिया यांनी बोलेरो जॅकेट घातलं होतं. तसंच खास प्रकारचे हातमोजेही घातले होते.

# कोलकाता बलात्कार, हत्या प्रकरणात आरोपी संजय रॉयला जन्मठेप

## सियालदह न्यायालयाचा निकाल; आरजी कर डॉक्टर बलात्कार हत्या प्रकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणात आरोपी संजय रॉयला शनिवारी विशेष न्यायालयाने दोषी ठरवलं. आता या प्रकरणी आज सियालदह न्यायालयाने आरोपी संजय रॉयला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. डळींश डु ने हे वृत्त दिलं आहे. या निकालाआधी दिवसभर जी सु-नावणी पार पडली त्यात हे प्रकरण दुर्मिळातलं दुर्मीळ आहे असं निरीक्षण कोर्टाने नोंदवलं. ९ ऑगस्ट २०२४ ला कोलकाता येथील आर. जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालय या ठिकाणी एका डॉक्टरवर बलात्कार करण्यात आला आणि त्यानंतर तिची हत्या करण्यात आली. रुग्णालयाच्या टाऊन हॉलमध्ये या डॉक्टरचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत आढळला होता. या मृतदेहावर अनेक जखमा होत्या. हे क्रौर्य पाहून पोलीस आणि शवविच्छेदन करणारे डॉक्टरही हादरले होते. तसंच पुढील दीड महिना या महाविद्यालयात काम करणाऱ्या डॉक्टरांनी संप पुकारला होता. दरम्यान या प्रकरणी न्यायाधीश अनिर्बान दास यांनी निकाल दिला आहे. ते २.४५ ला न्यायालयात आले. त्यानंतर त्यांनी हा निर्णय दिला.

**कोलकाता येथील आर. जी कर मेडिकल महाविद्यालय आणि रुग्णालयात एका डॉक्टरची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. त्याआधी तिच्यावर बलात्कार करण्यात आला. तिच्या मृतदेहावर अनेक जखमा होत्या. ९ ऑगस्ट २०२४ ला ही घटना घडली होती. या घटनेचा देशभरातून निषेध करण्यात आला. या घटनेवरुन देशभरातले डॉक्टर हे त्यांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर आक्रमक झाल्याचं शनिवारी पाहण्यास मिळालं. या घटनेतले नवे पैलू रोज समोर येत होते. तसंच आर. जी. कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील ट्रेनी विद्यार्थ्यांनी सुमारे दीड महिना आंदोलन केलं होतं. कोलकाता बलात्कार प्रकरणातला मुख्य आरोपी संजय रॉय हा रुग्णालयातील डॉक्टरवर बलात्कार करण्याआधी आणि तिची हत्या करण्याआधी तो रेड लाइट एरियात गेला होता अशी माहिती समोर आली होती. हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आलं आहे.**

कोर्टात आर. जी. कर बलात्कार आणि हत्या प्रकरणात सरकारी वकिलांनी हे म्हटलं आहे की ज्या प्रकरणांमध्ये आरोपींच्या सुधारणेला काहीही वाव नाही अशा प्रकरणांसाठी फाशीची शिक्षा राखीवच ठेवली पाहिजे. तर दुसरीकडे आरोपीच्या वकिलांनी आरोपीचं मानसिक आरोग्य ठीक नसल्याची कारणं दिली आणि फाशीची शिक्षा देण्याऐवजी पर्यायी शिक्षा देण्यात यावी असं म्हटलं होतं. सियालदह न्यायालय काय निर्णय देणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. संजय रॉयला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सु-नावली आहे.

आर. जी. कर रुग्णलयातील कर्मचारी संजय रॉयला न्यायालयाने या प्रकरणात दोषी ठरवलं आहे. त्याचे सीमन सँपलही जुळलं आहे. सीबीआयने हे म्हटलं आहे की सगळे परिस्थितीजनन्य पुरावे आणि फॉरेन्सिकचा अहवाल यानुसार बलात्कार आणि हत्येचा गुन्हा हा एकट्या संजय रॉयनेच केला आहे. ९ ऑगस्ट रोजी गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेला एक छोटा केसही फॉरेन्सिकमध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे असंही आरोप पत्रात नमूद करण्यात आलं आहे. हा केस संजय रॉयचा आहे असाही उल्लेख त्यात आहे. घटना घडल्यानंतर पुढच्या २४ तासांत संजय रॉयला अटक करण्यात आली होती.




## कर्नाटकात महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याची विटंबना; अक्कलकोट मध्ये पडसाद




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : १२ व्या शतकातील जगातील पहिले संसद स्थापना करणारे , क्रांतीसुर्य, जगदज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे काही समाजकटकांनी विटंबना केली आहे ही घटना कर्नाटकातील बिदर जिल्ह्यात घडली आहे तर या घटनेचे पडसाद अक्ककोट मध्ये उपटले आहेत ..

शहरामध्ये बसस्थानक येथे निषेध व निवेदन देण्यासाठी मोठा सर्व समाजाचे प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी वर्ग उपस्थित होते .या प्रसंगी मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली खाली नोदविण्यात आले निवेदन तहसीलदार मगर यांनी घेतले असून लवकरच आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याच्यावर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली.. या प्रसंगी राहुल वाडे, रुद्रय्या स्वामी , शिवराज जकापुरे, शिवशंकर स्वामी, धर्मा गुंजले, आनंद बुकानुरे, प्रशांत लोकापुरे, ऋषी लोणारी, धनराज पाटील, सत्यजित लोके, प्रीतीश किलजे, सौरभ हळके, प्रसन्न गवंडी, रोहित देशमख, रोहन देशमुख, मल्लिनाथ खुबा, सिद्धाराम माळी, निखिल पाटील, सुनील पाटील, अशोक जाधव, आदर्श पडणुरे, सिद्धाराम मशेट्टी, शरणू कापसे, दीपक रोडगे, शेखर वाले, संतोष स्वामी, मदन राठोड, नागू होलीकटी, सचिन पाटील, राज मद्रीकर, अनिल माने, अनिल नागणसुर, सिद्ध-ाराम पाटील, शरण नडगेरी , बसवराज पटणे आदी उपस्थित होते.

## एकनाथ शिंदेंच्या नाराजीमुळेच पालकमंत्री नियुक्तीला स्थगिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : पालकमंत्र्यांच्या नियुक्तीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्लीतील भाजप नेतृत्वाकडे नाराजी व्यक्त केल्यानंतरच रायगड आणि नाशिक या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला अवघ्या २४ तासांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिल्याचे समजते. दुसरीकडे, पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरून कोणताही वाद नाही, असा निर्वाळा महायुतीतील तिन्ही पक्षांच्या शीर्षस्थ नेत्यांनी सोमवारी दिला असला तरी यातून महायुतीत धुसफुस समोर आली आहे.

आपल्या निर्णयावर एरवी ठाम राहणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाराजीची तात्काळ दखल घेत रायगड आणि नाशिक जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यामागे दिल्लीचा हस्तक्षेप कारणीभूत ठरल्याचे सांगण्यात येत आहे. दावोस-ला रवाना होण्यापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यापूवी दिल्लीला मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांनी पाठविलेल्या यादीला दिल्लीतील भाजप नेतृत्वाने मान्यता दिली होती. रायगड व नाशिक या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद मिळावे यासाठी शिंदे गट आग्रही होता.

दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीस २४ तासांत स्थगिती देण्यात आल्याने शिंदे गट खुशीत असतानाच दिवसभर शिंदे गटाचे काही आमदार फुटणार अशी चर्चा सुरू झाली. शिंदे गटाचे २० आमदार भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त पसरण्यामागे पालकमंत्र्यांच्या स्थगितीचा काही संबंध आहे का, अशी शंका घेतली जाऊ लागली. शिंदे यांना शह देण्याकरिताच भाजपने ही चर्चा सुरू केल्याचे बोलले जाऊ लागले. गेल्या महिनाभरात भाजपकडून सातत्याने शिंदे यांची कोंडी केली जात असल्याने शिवसेनेच्या शिंदे गटात अस्वस्थता होती. पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरून शिंदे यांना धक्का देण्यात आला. यामुळेच नाराज झालेल्या शिंदे यांनी भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाकडे नाराजी व्यक्त केल्याचे समजते. यातूनच दावोसला दाखल (पान २ वर...)

## बदलापूरप्रकरणी चौकशी अहवालातील निष्कर्ष; पाच पोलिसांमुळेच आरोपीचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : बदलापूर येथील दोन शाळकरी बालिकांवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीला त्यावेळी त्याच्याबरोबर असलेले पाच पोलीस जबाबदार असल्याचा निष्कर्ष न्यायदंडाधिकाऱ्यांनी चौकशी अहवालात नोंदवला. चकमकीचा मोहोरबंद चौकशी अह-वाल न्यायदंडाधिकाऱ्यांनी सोमवारी उच्च न्यायालयात सादर केला. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या या निष्कर्षाच्या पार्श्वभूमीवर या पाच पोलिसांवर गुन्हा दाखल केला जाईल. या कथित चकमकीची चौकशी ठाणे येथील न्यायदंडाधिकारी अशोक शेंडगे यांनी केली. न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने न्यायदंडाधिकारी शेंडगे यांनी सादर केलेल्या चौकशी अहव-ालाची दखल घेतली. तसेच अहवाल-ात नोंदवण्यात आलेल्या निष्कर्षानुसार पोलीस याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यास आणि चौकशी करण्यास बांधील असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्याचवेळी, कोणत्या तपास यंत्रणेद्वारे प्रकरणाची चौकशी करणार, अशी विचारणा करून त्यावर दोन आठवड्यांत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश खंडपीठाने सरकारी वकील हितेन वेणेगावकार यांना दिले आणि त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या अहवालाची प्रत महानिबंधक कार्यालयाने सरकारी वकील आणि शिंदे याच्या कुटुंबीयांच्या वकिलांना उपलब्ध करून देण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले.

शिंदे याच्याशी झालेली चकमक बनावट असल्याचा दावा करून त्याच्या वडिलांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावेळी कायद्यानुसार या चकमकीची न्यायदंडाधिकाऱ्यांतर्फे चौकशी सुरू असल्याचे सरकारतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाच्या देखरेखीखाली प्रकरणाचा तपास सुरू होता.

भविष्यात अशा परिस्थितीत पोलिसांना घ्यावी लागणारी काळजी (पान २ वर...)


**म्हणून शेरॉनला मारण्याची योजना आखली** | **मरण्यापूर्वी मित्राला दिली होती कल्पना**

# विष देऊन बॉयफ्रेंडला मारलं; न्यायालयानं गर्लफ्रेंडला सुनावली मृत्यूदंडाची शिक्षा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लष्करी अधिकाऱ्याबरोबर लग्न ठरल्यानंतर बॉयफ्रेंडपासून पिच्छा सोडविण्यासाठी केरळमधील ग्रीष्मा नावाच्या तरुणीनं अतिशय थंड डोक्यानं बॉयफ्रेंड शेरॉन राज याचा खून केला. अनेकदा त्याला ज्यूसमधून अनेक पेनकिलर देऊनही त्याच्यावर काहीही फरक पडत नव्हता. शेवटी ग्रीष्मानं शेरॉन राजला आपल्या घरी बोलावलं आणि आयुर्वैदिक काढा देण्याच्या बहाण्याने त्याला विष पाजलं. यामुळे आठवड्याभरात शेरॉन राजचा मृत्यू झाला. मात्र ग्रीष्मा आणि तिच्या कुटुंबाचं बिंग फुटलं आणि आता तिला केरळच्या तिरुवनंतपुरम जिल्ह्यातील नेयट्टींकारा सत्र न्यायालयानं मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. डोकं सुन्न करणारी ही क्राइम स्टोरी मल्याळम सिनेमाच्या एखाद्या पटकथेसारखी आहे.

कन्याकुमारीला राहणारी ग्रीष्मा आणि तिरुवनंतपुरम मधील परसला येते राहणारा शेरॉन राज यांच्यात २०२१ साली महाविद्यालयात शिकत असताना प्रेमसंबंध निर्माण झाले. मार्च २०२२ मध्ये ग्रीष्माच्या कुटुंबियांनी तिचे लग्न एका लष्करी अधिकाऱ्याशी ठरविले. ग्रीष्मानेही यासाठी मान्यता दिली. लग्न ठरल्यानंतरही ग्रीष्मानं शेरॉन राजशी संबंध पूर्णपणे तोडले नाहीत. लग्नाची तारीख जवळ यायला लागली, तेव्हा तिनं शेरॉनला मारण्याची योजना आखली.



शेरॉनला मारण्यासाठी ग्रीष्मानं त्याला अनेकदा पाण्यात पेनकिलरच्या गोळ्या मिसळून दिल्या. पण या डोसचा त्याच्यावर फार काही परिणाम झाला नाही. ही क्लुप्ती तिनं इंटरनेटवर सर्च करून शोधली होती. पाणी आणि ज्यूसमधून पेनकिलरचा मारा करूनही शेरॉन मृत्यूमुखी पडत नाही, हे पाहून तिनं आणखी पुढे जाऊन शक्कल लढवली.

१४ ऑक्टोबर २०२२ रोजी ग्रीष्माच्या लग्नाला एक महिना बाकी असताना तिनं शेरॉनला तिच्या घरी बोलावलं आणि त्याला आयुर्वेदिक काढा प्यायला दिला. या काढ्यात तिनं तणनाशक मिसळले. आयुर्वेदिक काढा हा कडू असतो, हे मानून त्यात शेरॉनला काही वावगं वाटलं नाही. ग्रीष्माच्या घरून निघाल्यानंतर शेरॉनची प्रकृती खालावली. त्याला अस्वस्थ वाटून उलट्या होऊ लागल्या. ज्यामुळं त्याला रुग्णालयात दाखल केलं गेलं. २५ ऑक्टोबर रोजी २३ वर्षीय शेरॉनचा तिरुवनंतपुरममधील वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी शेरॉननं आपल्या मित्राशी बोल-ताना ग्रीष्मानं काहीतरी संशयास्पद प्यायला दिल्याचं सांगितलं. तसेच तिनं आपल्याला फसवलं, असंही तो म्हणाला. शेरॉनच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबियांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

ग्रीष्माला ३१ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली. त्यानंतर सप्टेंबर २०२३ मध्ये तिला जामीन मिळाला. या गुन्ह्यात ग्रीष्माची आई आणि तिच्या काकालाही अटक करण्यात आली होती. गुन्ह्यात मदत करणे आणि पुरावा नष्ट करण्याचा त्यांच्यावर आरोप ठेवला गेला. पोलिसांच्या चौकशीत ग्रीष्मानं सांगितलं की, लग्न ठरल्यानंतर तिनं शेरॉनला संबंध तोडण्यास आणि फोनमधील खासगी क्षणाचे फोटो डिलीट करण्यास सांगितले होते. पण तरीही शेरॉन फोटो आणि व्हिडीओ तिच्या होणाऱ्या पतीबरोबर शेअर करेल, अशी भीती तिला वाटत होती. यातूनच तिनं त्याचा खून करण्याचा निर्णय घेतला.

## संपादकीय....

### नियुक्तीला स्थगिती ?

पालकमंत्र्यांच्या नियुक्तीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी दिल्लीतील भाजप नेतृत्वाकडे नाराजी व्यक्त केल्यानंतरच रायगड आणि नाशिक या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला अवघ्या २४ तासांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिल्याचे समजते. दुसरीकडे, पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरून कोणताही वाद नाही, असा निर्वाळा महायुतीतील तिन्ही पक्षांच्या शीर्षस्थ नेत्यांनी सोमवारी दिला असला तरी यातून महायुतीत धुसफुस समोर आली आहे. आपल्या निर्णयावर एरवी ठाम राहणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाराजीची तात्काळ दखल घेत रायगड आणि नाशिक जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यामागे दिल्लीचा हस्तक्षेप कारणीभूत ठरल्याचे सांगण्यात येत आहे. दावोसला रवाना होण्यापूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पालकमंत्र्यांची यादी जाहीर केली. पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यापूवी दिल्लीला मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांनी पाठविलेल्या यादीला दिल्लीतील भाजप नेतृत्वाने मान्यता दिली होती. रायगड व नाशिक या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद मिळावे यासाठी शिंदे गट आग्रही होता. दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्तीस २४ तासांत स्थगिती देण्यात आल्याने शिंदे गट खुशीत असतानाच दिवसभर शिंदे गटाचे काही आमदार फुटणार अशी चर्चा सुरू झाली. शिंदे गटाचे २० आमदार भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त पसरण्यामागे पालकमंत्र्यांच्या स्थगितीचा काही संबंध आहे का, अशी शंका घेतली जाऊ लागली. शिंदे यांना शह देण्याकरिताच भाजपने ही चर्चा सुरू केल्याचे बोलले जाऊ लागले. गेल्या महिनाभरात भाजपकडून सातत्याने शिंदे यांची कोंडी केली जात असल्याने शिवसेनेच्या शिंदे गटात अस्वस्थता होती. पालकमंत्र्यांच्या नियुक्तीवरून शिंदे यांना धक्का देण्यात आला. यामुळेच नाराज झालेल्या शिंदे यांनी भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाकडे नाराजी व्यक्त केल्याचे समजते. यातूनच दावोसला दाखल होताच रायगड व नाशिकच्या पालकमंत्रीपदाच्या नियुक्तीला स्थगिती देण्याची वेळ मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर आली.

# महाआवास अभियानातील घरकुले शंभर दिवसात पूर्ण करण्यात यावी : ग्रामविकास प्रधान सचिव एकनाथ डवले

## महा आवास अभियान २०२४-२५ अंतर्गत पुणे विभागस्तरीय कार्यशाळा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजना या महत्त्वकांक्षी योजनेद्वारे पुणे विभागात २० लाख लाभार्थ्यांना घरकुले उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट शासनाने निर्धारित केले आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी ताळमेळ ठेवून महाआवास अभियानांतील घरकुले शंभर दिवसात पूर्ण करून लाभार्थ्यांना हस्तांतरीत करण्यात यावी, असे निर्देश ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी दिले.



महा आवास अभियान २०२४-२५ अंतर्गत पुणे विभागस्तरीय कार्यशाळा शुभारंभप्रसंगी आयोजित बैठकीत अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण प्रकल्प डॉ. राजाराम दिघे, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, सांगली जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती घोडमिसे, कोल्हापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी एस.कार्तिकेयन, उपायुक्त (विकास) विजय मुळीक यावेळी उपस्थित होते. तर पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सांगलीचे जिल्हाधिकारी डॉ.राजा दायानिधी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद आणि सातारा निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

प्रधान सचिव श्री. डवले म्हणाले, केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना १०० दिवसाच्या कालावधीत अधिक गतिमान करण्यासाठी महाअवास अभियान राबविण्यात येत आहे. लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाची आणि विहित मुदतीत घरकुले उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करताना जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणांनी योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील सर्व त्रुटींची तातडीने पूर्तता करून आणि मानवीय दृष्टिकोनातून लाभार्थ्यांना घरकुले हस्तांतरित करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करावे. अकारण त्रुटी काढून कामे रेंगाळणार नाहीत याची दक्षता घ्यावी. विविध कायद्यांचा आणि नियमांचा उपयोग हा अडचणी निर्माण करण्यासाठी न करता लोकांसाठी निवारा निर्माण व्हावा यासाठी करावा. यावेळी त्यांनी विभागातील जिल्हाधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून संवाद साधून योजनेच्यासंबंधी अडचणी जाणून घेतल्या आणि त्यावर मार्गदर्शन केले. केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या प्रगतीचा आढावा यावेळी त्यांनी घेतला.

जिल्हाधिकाऱ्यांनी घरकुल योजनांसाठी जमीन उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करावी. त्यासाठी वन विभागाच्या अधिकाऱ्यांचाही सहभाग घेण्यात यावा. घरकुलांची उभारणी झालेल्या ठिकाणी संवदेनशिलतेचा, कल्पकतेचा वापर करुन परिसर विकासावर भर द्यावा. वृक्षारोपण, रस्ते, स्ट्रीट लाईटस्, सोलार प्रकल्प उभारावेत. त्यासाठी जिल्हा परिषद आणि महसूल यंत्रणांनी समन्वयाने काम करावे अशी सूचना विभागीय आयुक्तांनी केली. शंभर दिवसात पूर्ण करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत महा आवास अभियान प्रगतीचा आढावा घेण्यात येणार असल्याने सर्व संबंधितांनी योजनेची काळजीपूर्वक अंमलबजावणी करण्याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

**विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, घरकुलासंबंधी लाभार्थ्यांची नोंदणी करताना त्यांच्या वैयक्तिक नोंदी तसेच आधार क्रमांकाची नोंद यंत्रणांनी अचूकपणे करण्याची दक्षता घ्यावी. तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांशी यासाठी प्रत्यक्ष संवाद साधावा.**

संचालक श्री. दिघे यांनी लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाची घरकुले मिळावी यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी स्थानिक स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करून अडचणी सोडवाव्या असे सांगितले. उपायुक्त विकास श्री.मुळीक यांनी बैठकीत विविध घरकुल योजनांचे उद्दिष्ट व त्याची पूर्तता याची माहिती दिली.

बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, आदिम आवास योजना, पारधी आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना, मोदी आवास योजना, पीएम जनमन योजना आणि पंडीत दिनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनांच्या अंमलबजावणीचा विभागस्तरीय आढावा घेण्यात आला. यावेळी महा आवास अभियान २०२४-२५ च्या माहिती पत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

## बदलापूरप्रकरणी चौकशी अहवालातील निष्कर्ष; पाच पोलिसांमुळेच आरोपीचा मृत्यू

(पान १ वरून..) आणि खबरदारीबाबतही न्यायदंडाधिकाऱ्यांनी अहवालात सूचना केली आहे. त्यानुसार कोठडीत असलेल्या आरोपीला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना त्याची वाहनातील डॅश कॅमेऱ्याच्या सहाय्याने चित्रफित तयार केली जावी. ही चित्रफित तयार करण्याची जबाबदारी वाहनाच्या चालकावर ठेवावी. त्यानुसार चित्रिकरण सुरू झाले की नाही याची त्याने खातरजमा करावी. याशिवाय कॅमेरा कार्यान्वित आहे की नाही हे तपासण्याची जबाबदारी ही आरोपीला अन्यय ठिकाणी घेऊन जाणाऱ्या वरिष्ठ पोलिसावर असेल. वाहनातील डॅश कॅमेरा कार्यान्वित नसल्यास त्याबाबत चालकाने आणि संबंधित अधिकाऱ्याने वरिष्ठांना कळवावे व कॅमेरा दुरूस्त करावा किंवा अन्य वाहनाची सोय करावी, असे न्यायदंडाधिकाऱ्यांनी अहवालात म्हटले आहे.

आरोपीने एका अधिकाऱ्याचे पिस्तूल हिसकावून गोळीबार केला. त्यामुळे स्वसंरक्षणार्थ त्याच्यावर गोळीबार केल्याचा दावा पोलिसांनी केला होता. त्यामुळे अक्षयसह वाहनात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी बळाचा वापर करणे योग्य आहे होते का, असा प्रश्न निर्माण झाला. चौकशीदरम्यान सादर करण्यात आलेले पुरावे विचारात घेता आरोपीसह वाहनात असलेले चार पोलीस परिस्थिती हाताळण्याच्या स्थितीत होते. शिवाय न्यायवैद्याक प्रयोगशाळेच्या अहवालानुसार आरोपीने हिसकावून घेतलेल्या पिस्तुलावर त्याच्या हाताचे ठसे आढळलेले नाहीत.

आरोपीने गोळीबार केल्याची कोणतीही चिन्हे त्याला घातलेल्या बेड्या, कपड्यांवर आढळलेली नाहीत. अशा स्थितीत पोलिसांनी बळाचा वापर करणे योग्य नव्हते हे ठळकपणे स्पष्ट होते.

या चकमकीबाबत संशय निर्माण करणाऱ्या अनेक बाबी असून हे पाच पोलीस आरोपीच्या मृत्यूस जबाबदार आहेत, असा निष्कर्ष न्यायदंडाधिकाऱ्यांनी अहवालात नोंदवला.

हे पोलीस जबाबदार

ठाणे गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे, हवालदार अभिजीत मोरे, हरीश तावडे आणि पोलीस वाहन चालक.

# युवकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मसात करावे : डॉ शहाजी चंदनशिवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परंडा/प्रतिनिधी : युवकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मसात करून देशहिताचे कार्य करावे असे प्रतिपादन शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयात आयोजित केलेल्या राष्ट्रीय युवा दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग व उपजिल्हा रुग्णालय परांडा यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव उपस्थित होते . प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हा रुग्णालयातील समुपदेशक मकरंद वांबुरकर तसेच कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून महाविद्यालयातील समाजशास्त्राचे प्राध्यापक भाऊसाहेब माने तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ अमर गोरे पाटील उपस्थित होते . पुढे बोलताना प्रा बी डी माने म्हणाले की स्वामी विवेकानंद यांनी देशातील तरुणांना प्रोत्साहित केले . त्याचे विचार महान होते . आयुष्याला कलाटणी देणारे त्यांचे विचार असल्याने ज्यांनी त्यांचे विचार आत्मसात केले त्यांच्या जीवनाचे कल्याण झाले . देशाचे भवितव्य असलेला आजचा तरुण हा व्यसनाधीन झालेला आहे . त्यामुळे त्याचे ध्येय त्याचे भविष्य अंधारमय झालेले आहे .तेव्हा महाविद्यालयातील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त अवांतर वाचनही केले पाहिजे . महापुरुषांची पुस्तके वाचली पाहिजेत . तरच तुम्हाला महापुरुषांचा इतिहास माहीत होईल.



अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ सुनील जाधव म्हणाले की महाविद्यालयात जे विद्यार्थी नियमीत येतात त्यांच्यासाठी महाविद्यालयाने अनेक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत विविध कोर्सेस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या करिअरच्या संधी निवडता येतात .विद्यार्थ्यांनी थोरा मोठ्यांच्या व गुरुजनांचा मानसन्मान केला पाहिजे . आई-वडिलांनी सांगितलेल्या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले पाहिजे . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे यांनी केले तर आभार प्रा वरपे यांनी मानले . यावेळी कार्यक्रमासाठी प्रा दीपक हुके प्रा अजित क्षीरसागर प्रा वरपे प्रा प्रतिभा माने प्रा मोरवे यांच्यासह विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## एकनाथ शिंदेंच्या नाराजीमुळेच पालकमंत्री नियुक्तीला स्थगिती

(पान १ वरून..) होताच रायगड व नाशिकच्या पालकमंत्रीपदाच्या नियुक्तीला स्थगिती देण्याची वेळ मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर आली. रविवारी सुट्टीच्या दिवशीही रात्री उशिरा स्थगितीचा शासकीय आदेश जारी करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

नाशिकमध्ये मुख्यमंत्र्यांचे विश्वासू सहकारी व भाजपचे संकटमोचक म्हणून प्रसिद्ध असलेल्या गिरीश महाजन यांच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली ही बाब अधिक गंभीर मानली जाते.

संजय शिरसाट यांची 'सिडको'च्या अध्यक्षपदावरून करण्यात आलेली उचलबांगडी, एस. टी. बसेस खरेदीची निविदा रद्द करणे याशिवाय अन्य काही निर्णयांमुळे शिंदे अस्वस्थ होते.

रायगड व नाशिक या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदाच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आली असली तरी महायुतीत कोणतेही मतभेद नाहीत, असा निर्वाळा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. मुख्यमंत्री दावोसहून परतल्यावर चर्चेतून मार्ग काढला जाईल, असे शिंदे व पवार यांनी म्हटले आहे.

कोकणात कोणत्याच जिल्ह्यात राष्ट्रवादीला पालकमंत्रीपद मिळाले नव्हते. यातूनच रायगडचे पालकमंत्रीपद राष्ट्रवादीला देण्याचा निर्णय झाला होता, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. नाशिकमधील कुंभमेळाच्या नियोजनासाठीच गिरीश महाजन यांच्याकडेच पालकमंत्रीपद कायम ठेवण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## मान्यवरांची उपस्थितीत मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलचे चेतन जाधव यांना जिल्हास्तरीय कृतीशील पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना प्रेरणा, प्रोत्साहित करण्यासाठी शाबासकीची थाप देणे गरजेचे आहे. त्यामुळे ते पुन्हा उत्साहाने काम करतील व भारताची भावी पिढी घडवतील. यासाठी गुणवंतांना जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे असे प्रतिपादन माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी व्यक्त केले.



केगाव येथील सिंहगड इन्स्टिट्यूट येथे महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीचे जिल्हस्तरीय पुरस्कार वितरणप्रसंगी माजी शिक्षक आमदार सावंत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.शेखर जगदे,जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर,शंकर वडणे,परमेश्वर व्हसुरे,सुरेश नेलुरे,सरदार नदाफ आदी उपस्थित होते. अक्कलकोट तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून श्री अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर, जिल्हास्तरीय आदर्श लिपिक म्हणून मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलचे चेतन जाधव, श्री शिवचलेश्वर प्रशाला मैंदर्गीचे आदर्श शिक्षक म्हणून रमेश येणगुरे, आदर्श मुख्याध्यापक राजकुमार कुलकर्णी,शंकरराव शरणाप्पा आष्टे प्रशाला भुरीकवठे, संजयकुमार लिंबितोटे सेवक अशा प्रकारे अक्कलकोट तालुक्यातील विविध शाळा,शिक्षक व शिक्षकेत्तर यांना सन्मानित करण्यात आले.

### चेतन जाधव यांना पुरस्कार प्रदान

अक्कलकोट येथील मराठा मंदिर श्री शहाजी हायस्कूलचे शिक्षकेत्तर कर्मचारी चेतन जाधव यांना महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने देण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय कृतिशील लिपिक पुरस्कार माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यास सिंहगड कॉलेजचे प्राचार्य डॉ.शेखर जगदे,कृती समितीचे गुरुनाथ वांगीकर, जिल्हा समन्वयक परमेश्वर व्हसुरे,शंकर वडणे उपस्थित होते.

# जि. प. बोरिवली आदिवासी पाड्यातील (आनंद नगर) मराठी शाळा अंधारात; पाण्याची देखिल गैरसोय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भारताची डिजिटल इंडियाकडे वाटचाल सुरू असताना देशाचे भवितव्य घडविणाऱ्या सामान्यांची जिल्हा परिषद शाळेत वीज आणि पाणी नसल्यामुळे भिवंडी तालुक्यातील पडघा केंद्रातील जिल्हा परिषद आदिवासी पाडा ( आनंद नगर) बोरीवली मराठी शाळेत विद्यार्थ्यांना गर्मीमध्ये बसावं लागत आहे. शाळेला वीज नसल्यामुळे ,शाळेला पाण्याची देखिल गैरसोय होत आहे. शाळेच्या सोयी सुविधांकडे बोरीवली ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. म्हणून पालकांनी,गावकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.



जिल्हा परिषद आदिवासी पाडा ( आनंद नगर) बोरीवली मराठी शाळेच्या शिक्षकांनी बोरीवली ग्रामपंचायत मध्ये सोयीसुविधाबाबत अर्जाद्वारे तक्रार मांडली. परंतु बोरीवली ग्राम पंचायतिने त्या अर्जाला केराची टोपली दाखवत आदिवासी वाडीतील शाळेकडे दुर्लक्ष केले आहे. पाण्याने विद्यार्थ्यांची तहान भागवता येते. मात्र शाळेला वीज नसल्यामुळे बोरिंगचे पाणी देखील विद्यार्थ्यांना मिळत नसल्याने अजून देखील आदिवासी पाड्यातील शाळा विजेपासून आणि पाण्यापासून वंचितच का? असा सवाल पालकांकडून, स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

### बोरीवली ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष; नागरिकांची नाराजी

शाळेला नवीन मीटर साठी टोरेंट पावर कडे आम्ही अर्ज दिलेला असून लवकरच शाळेला मीटर लावण्यात येईल. असे बोरिवली ग्रा. प. ग्रामसेवक आर. जे. म्हस्के यांनी बोलताना सांगितले.

सदर जिल्हा परिषद आदिवासी पाडा ( आनंद नगर) बोरीवली मराठी शाळा पाण्यापासून आणि विजेपासून वंचितच राहणार का? यावर कोणती उपायोजना होईल की नाही? म्हणून बोरिवली ग्राम पंचायतीकडे पालकांचे, ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## बेटी बचाओ बेटी पढाओ योजना.....

# विविध विभागांनी १० वर्ष पूर्ती निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## जिल्ह्यात २२ जानेवारी ते ८ मार्च २०२५ या कालावधीत विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत मुलींच्या जीवनाची हमी देण्यासाठी, बेटी बचाओं बेटी पढ़ाओ ही योजना राबविण्यात येते. या योजनेला दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होत आहेत. महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्ह्यात दिनांक २२ जानेवारी २०२५ ते ०८ मार्च २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्या सर्व कार्यक्रमाची संबंधित विभागांनी प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

बेटी बचाओ बेटी पढाओ अंतर्गत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी अतिरिक्त पोलीस अधिक्षक प्रीतम यावलकर,महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रमेश काटकर, जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार, बाल विकास प्रकल्प अधिकारी विजय खोमणे, यांच्यासह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की महिला व बाल विकास बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय शिक्षण विभाग आरोग्य विभाग वन विभाग न्याय विभाग यांनी दिनांक २२ जानेवारी ते ८ मार्च २०२५ या कालावधीत बेटी बचाअो बेटी पढाओ योजनेअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करावे. विविध जनजागृती उपक्रमातून लिंगभेद चाचणी पद्धतीने प्रतिबंध करण्यासाठी तसेच मुलींचे संरक्षण आणि त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान सर्व संबंधित विभागाने दिले पाहिजे असे त्यांनी सुचित केले.

महिला व बालविकास विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी प्रत्येक विभागाने या कालावधीत करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ते पुढील प्रमाणे...

**विविध विभागांनी करावयाची कार्यवाही :-**

एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत सोलापूर जिल्हयामध्ये १६ ग्रामीण प्रकल्प व ४ नागरी प्रकल्प कार्यरत असून बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमात त्यांचे महत्त्व आहे. या उपक्रमाला दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी दहा वर्षे पूर्ण होणार असल्याने, २२ जानेवारी ते ८ मार्च २०२५ कालावधीत या संबंधित विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात यावेत.

१. आयसीडीएस, शिक्षण विभाग, पोलीस विभाग:-

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ शपथ आणि स्वाक्षरी मोहीम महिला आणि बालविकास विभागाच्या नेतृत्वाखाली आयोजित करणे, शपथ आणि स्वाक्षरी मोहीम संयोजकाने आयोजनाची तारीख, वेळ आणि ठिकाण ठरवावे. शाळांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी सत्र आयोजित करावे. बाईक/सायकल रॅली: पोलीस विभागाच्या सहकायनि आयोजित करणे. रॅलीची तारीख, वेळ आणि मार्ग ठरवून सहभागींना माहिती द्यावी. महिलांच्या सक्षमीकरणाचे बॅनर आणि फलक तयार करावे.

प्रभात फेरी: स्थानिक प्रशासनाच्या सहकायनि आयोजित करणे. प्रभात ३ फेरीची तारीख, वेळ आणि मार्ग ठरवून सहभागींना माहिती द्यावी. स्थानिक शाळा आणि समुदायांना सहभाग करण्यासाठी आमंत्रित करावे. सांस्कृतिक कार्यक्रम: सांस्कृतिक विभागाच्या नेतृत्वाखाली आयोजित करणे. विविध शाळा आणि कला संस्थांमध्ये स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे. महिलांच्या सशक्तीकरणाचे संदेश देणारे नाट्य, नृत्य आणि गायन सादर करावे.

२.शिक्षण विभाग, महिला व बाल विकास विभाग. आरोग्य विभाग, वन विभाग

शिक्षण कार्यक्रम, दौरे आणि जागरूकता मोहीम WHL- १८१ आणि CHL- १०९८: शिक्षण विभागाने शाळांमध्ये शैक्षणिक कार्यक्रम आणि जागरूकता मोहीम आयोजित करावी. हेल्पलाइन क्रमांकांचा प्रचार करण्यासाठी विशेष सत्रे आयोजित करावी.

मैदानातील भेटी/जनतेशी संवाद/जागरूकता सत्रे/कॅम्प/प्रशिक्षण सत्रे :- महिला आणि बालविकास विभागाने विविध क्षेत्रांमध्ये सत्रे आयोजित करावी. प्रशिक्षण देण्यासाठी व्याख्याते आणि तज्ञांची निवड करावी.

मासिक पाळी स्वच्छता जागरूकता आणि सॅनिटरी पॅड वितरणः आरोग्य विभागाने शाळांमध्ये आणि समुदायांमध्ये मासिक पाळी स्वच्छता जागरूकता सत्रे आयोजित करावी. सॅनिटरी पॅड वितरण करण्यासाठी योजना आखावी.

सॅनिटरी पॅड मशीनची स्थापना: शिक्षण विभागाने सरकारी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सॅनिटरी पॅड मशीनची स्थापना करण्यासाठी सहकार्य करावे, खासगी शाळांमध्येही हे मशीन स्थापित करण्यासाठी प्रयत्न करावे. मुलांचे आणि पुरुषांचे लैंगिक संवेदनशीलतेचे प्रशिक्षणः सामाजिक न्याय विभागाने शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी लैंगिक संवेदनशीलतेचे प्रशिक्षण सत्रे आयोजित करावी.

पीसीपीएनडीटी कायद्यावरील मोहीम :- आरोग्य विभागाने पीसीपीएनडीटी कायद्याच्या पालनावर जागरूकता सत्रे आणि मोहीम आयोजित करावी.

वन विभागाच्या सहकार्याने वृक्षारोपण मोहीम वन विभागाने विविध विभागांच्या सहकार्याने विविध ठिकाणी वृक्षारोपण मोहीम आयोजित करावी.




क्रीडा सप्ताहः क्रीडा विभागाने विविध खेळांचे स्पर्धा आणि शिबिरे आयोजित करावे. विद्यार्थी, कर्मचारी आणि स्थानिक समुदायाला सहभागासाठी प्रोत्साहित करावे.

शाळांमध्ये मुलींच्या नावनोंदणीसाठी मोहीमः शिक्षण विभागाने शाळांमध्ये मुलींच्या नावनोंदणीसाठी जनजागृती मोहीम आणि नावनोंदणी कार्यक्रम आयोजित करावे. सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.० अंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी योजनाः महिला आणि बालविकास विभागाने किशोरवयीन मुलींसाठी विविध योजनांवर जनजागृती मोहीम आणि नावनोंदणी कार्यक्रम आयोजित करावे.

महिला व बालविकास, शिक्षण, आरोग्य व जिल्हा कौशल्य विकास विभाग:-

PMMVY वर जागरूकता मोहीमः महिला आणि बालविकास विभागाने हेल्पलाइन क्रमांक आणि PMMVY योजनेवर जनजागृती मोहीम आयोजित करावी. जागरूकता सत्रे/जनतेशी संवादः महिला आणि बालविकास विभागाने विविध क्षेत्रांमध्ये जनतेशी संवाद साधून जागरूकता सत्रे आयोजित करावी.विविध विभागांशी सहयोग आणि हेल्पलाइन नंबर लोकप्रिय करणेः महिला आणि बालविकास विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, पंचायत राज विभाग आणि ग्रामीण विकास विभाग यांच्या सहयोगाने, हेल्पलाइन क्रमांक लोकप्रिय करण्यासाठी मोहीम आयोजित करावी. पीसीपीएनडीटी कायद्यावरील मोहीमः आरोग्य विभागाने पीसीपीएनडीटी कायद्याच्या पालनावर जनजागृती सत्रे आणि मोहीम आयोजित करावी. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागासह सहकार्यः कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाने विविध कौशल्य विकास कार्यक्रम आणि जागरूकता सत्रे आयोजित करावी. तसेच सर्व विभागांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे माहिती व फोटो अहवाल या dyceocwsolapur@gmail.com मेल आयडीवर वेळोवेळी पाठवावेत.

---

## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने पळवली रिक्षा, गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : मल्लिकार्जुन नगर येथे पार्क केलेली रिक्षा क्रमांक एम एच.१३.एएफ.२७७७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ जानेवारी रोजी घडली.याप्रकरणी अंबादास भगवान गवंडी (वय-५८,रा.मल्लिकार्जुन नगर,अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

### हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम एच.१३.सीसी.२३६९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहा ते साडेसात वाजण्याच्या दरम्यान मराठा वस्ती येथे घडली. याप्रकरणी आदर्श चंद्रकांत बंडगर (वय-२४,रा. मराठा वस्ती,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

---

# मनोज शिंदे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने नूतन खासदार प्रणिती शिंदे यांचा सत्कार

## भीमराव शिंदे यांचा काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर प्रतिनिधी/देविदास माने : मातोश्री रमाबाई आंबेडकर नगर प्रभाग क्रमांक एक येथे मनोज शिंदे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने सोलापूरच्या नुतन खासदार प्रणिती शिंदे यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

तसेच भीमराव शिंदे यांचा काँग्रेस पक्षामध्ये जाहीर पक्षप्रवेश तसेच गरजू महिलांना साडी वाटप करण्यात आले.




यावेळी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष अक्षय थोरात, काँग्रेस अनुसूचित जाती शहर अध्यक्ष उमेश सुरते , कामगार नेते बापू सदाफुले, विश्वभुषण कांबळे, काँग्रेस अनुसूचित शहर उपाध्यक्ष साहिल मस्के, काँग्रेसचे शहर सचिव चिंटु कांबळे, आप्पा शिंदे, सुमित मस्के, संजय कांबळे, मंगेश जगताप, प्रफुल्ल वाघमारे, साहिल शिंदे, सुरेश शेरखाने, तसेच सीके ग्रुपचे अध्यक्ष किरण शेरखाने आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी मनोज शिंदे बहुउद्देशीय सामाजिक संस्था , सम्राट युथ फेडरेशन, छत्रपती शाहू महाराज बहुउद्देशीय सामाजिक संस्था व सीके मित्र परिवाराच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

---

# श्री माणकेश्वर वाचनालयात न्या. रानडे वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड चे भूमीपुत्र न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जयंती निमित्त श्री माणकेश्वर वाचनालय आयोजित स्व. सुरेखा दत्तात्रय गवते स्मृती न्या रानडे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन नगरसेवक सागर पा. कुंदे, मा.नगरसेक दिलीप आबा कापसे यांच्या हस्ते न्या. रानडेंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. याप्रसंगी सिंधुताई कुंदे यांची शेतकरी सहकारी संघाच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला..... कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मेघा जंगम .यांनी केले. यावेळी इ. पहिली ते चौथी, इ. पाचवी ते सातवी, इ. आठवी ते दहावी आणि महाविद्यालयीन गट या चार गटात ही स्पर्धा घेण्यात आली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धा समाप्तीनंतर लगेचच करण्यात आला. नामको बँकेचे नवनिर्वाचित व्हाईस चेअरमन सुभाष भाऊ नहार, निफाड अर्बन बँकेचे चेअरमन राजेंद्र राठी, कॉन्टॅक्टर राहुल धात्रक, मनमाड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष भीमराव जेजूरे,विकास सोसायटीचे चेअरमन शिवाजीराजे ढेपले आदींच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वि दा व्यवहारे होते. स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे पहिली ते चौथी गट प्रथम क्रमांक ओवी कैलास हैसधूणे., द्वितीय क्रं. कस्तुरी गोविंद रायते, तृतीय क्रं. शिवांजली प्रदीप पवार तर उत्तेजनार्थ .प्रसाद अनुरूप कुंभारडे .तर पाचवी ते सातवी गट प्रथम क्रं, प्रणाली रामेश्वर वरकड .. द्वितीय क्रं. अन्वित सचिन जाधव. तृतीय क्रं. स्पर्श दिगंबर दौंड . तर उत्तेजनार्थ स्वरा संदीप भाबड, . तसेच आठवी ते दहावी गटात प्रथम स्वरा संदीप मगर , द्वितीय आराध्या प्रभाकर शिरसाठ,, तृतीय क्रं.वेदिका दत्तात्रय देशमुख,.उत्तेजनार्थ अस्मिता अजय शिंदे .तर महाविद्यालयीन गटात प्रथम क्रं. दिव्या उपेंद्र सोनवणे.. द्वितीय क्रं. कार्तिकी राजेंद्र घोटेकर . तृतीय क्रं. तेजस्विनी भागवत मोरे . तर उत्तेजनार्थ सृष्टी रवींद्र वाघचौरे या सर्व विजयी स्पर्धकांना सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले,




कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष मधुकर शेलार यांनी केले. न्यायमूर्ती रानडेंच्या अभ्यासक डॉ. तारा पाटील यांनी वाचनालयास शोध प्रबंध भेट दिला. त्यांचाही सन्मान वाचनालयातर्फे करण्यात आला. वि दा व्यवहारे, राजाभाऊ राठी, शिवाजी राजे ढेपले यांनी मनोगत व्यक्त केले आणि शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे परीक्षण मंदाकिनी भागवत, बाळासाहेब गिरी, वैजयंती सिन्नरकर व वर्षा वाघ यांनी केले. वाचनालयातर्फे परीक्षकांचाही सन्मान करण्यात आला. स्पर्धेसाठी जिल्हाभरातून विद्यार्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद नोंदवला. उपस्थित विद्यार्थांना रायगड ग्रुप तर्फे बिस्कीट आणि पाणी वाटप केले.

या कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, संचालक महेश बनकर, सुनील चिखले, राजेंद्र खालकर, माजी संचालक संजय घुमरे, अशोक पगारे,माजी सरपंच रघुभाऊ कुंदे, बाळासाहेब जंगम, अरुण शिंदे, अमोल जाधव,जयश्री शिरसाट, पवन टर्ले प्रभारी ग्रंथपाल नितीन बनसोडे कर्मचारी विद्या बंद्रे, नंदकुमार पुंड अनिता ईस्ते, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक सुहास सुरळीकर तर आभार प्रदर्शन प्रा.महेश बनकर, राहुल दवते यांनी केले.

---

भगवानभाऊ नारायणराव मनमाडकर यांची माहिती

उद्या संपन्न होणार कार्यक्रम

# शुभांगीताई (राधामाई) मनमाडकर ६१ वा अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरा शहरांतील संगीत क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण योगदान असणारे व संगीत विशारद या पदाचे मानकरी असणाऱ्या व तसेच संस्कार भारती या संस्थेच्या माध्यमातून सांस्कृतिक धार्मिक सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ शुभांगीताई (राधामाई) मनमाडकर ६१ अभिष्टचिंतन सोहळ्याच्या औचित्य साधून पंढरपूर शहरामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे केल्याची माहिती पंढरपूर शहरातीधील मंडप कॉन्ट्रॅक्टर लाईट डेकोरेशन साऊंड साऊंड सिस्टिमचे सुप्रसिद्ध आरती मंडप कॉन्टॅक्टर चे सर्वेसर्वा श्री भगवानभाऊ नारायणराव मनमाडकर यांनी दिली.

सदर ६१ अभिष्टचिंतन सोहळा सौ कल्याणी नामजोशी पुणे व ह भ प श्री संत डॉ. जयवंत महाराज बोधले पंढरपूर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार असून या कार्यक्रमाच्या निमित्ताने इंडियन आयडॉल विजेती कुमारी ज्ञानेश्वरी गाडगे मुंबई हिचा चोर ज्ञानेश्वरी भक्ती अभंग नाट्यसंगीत आधी भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले असून सदर कार्यक्रम वैकुंठवासी डॉ. दादा महाराज मनमाडकर नगर पंढरपूर या ठिकाणी बुधवार दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजता संपन्न होणार असून सदर कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आव्हान भगवान भाऊ मनमाडकर यांनी केले असून कार्यक्रमानंतर सर्वांसाठी स्नेह भोजनाची व्यवस्था सायंकाळी ७ वाजल्यापासून केले असून. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनमाडकर परिवारातील आरती मनमाडकर पल्लवी मनमाडकर चि. समय मनमाडकर सर्वश्री निरंजन महाराज मनमाडकर धनंजय मनमाडकर व कु. निष्ठा मनमाडकर आदीसह सर्व कर्मचारी बंधू परिश्रम घेत आहेत



---

# मराठी पत्रकार परिषद सिंदखेड राजा तालुका कार्यअध्यक्षपदी भगवान साळवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या सिंदखेड राजा तालुका कार्याध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार

भगवान साळवे यांची निवड करण्यात आली

मातृतीर्थ सिंदखेडराजा तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी गठित करण्यासाठी जिल्हाध्यक्ष रणजित राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृहावर बैठक पार पडली असून यामधे कार्याध्यक्ष भगवान साळवे तालुका अध्यक्ष, गजानन मेहेत्रे , तर सचिव म्हणून बुद्धू चौधरी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी यावेळी शिवाजी मामलकर जिल्हा सचिव, केंद्रीय सदस्य रविंद्र फुलांने , जिल्हा निमंत्रक रामदास कहाळे यांच्या सह राहुल झोटे, एकनाथ म्हस्के, वसीम शेख, आदी पत्रकार उपस्थित होते. यावेळी जिल्हाध्यक्ष रणजित राजपूत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की लोकशाही मध्ये सर्व पत्रकाराना समान न्याय या पद्धतीने जिल्हा पत्रकार संघात सन्मान केल्या जाईल त्याचा बरोबर पत्रकाराच्या न्याय हक्का साठी सदैव तत्पर असल्याच्या भावना रणजित राजपूत यांनी व्यक्त केल्या. यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष गजानन मेहेत्रे, कार्याध्यक्ष भगवान साळवे, तर सचिव म्हणून बुद्धू चौधरी यांचा सत्कार करण्यात आला यावेळी तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.



## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून दमदाटी करत मारहाण

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून एकास शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १८ जानेवारी रोजी रात्री मंगळवार बाजार येथे घडली. याप्रकरणी गुरुदेवी काशिनाथ काळे (वय-३२,रा.मुकुंद नगर,न्यू बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून सागर दत्तात्रय वडतिले (रा.मराठा वस्ती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी काम करत असलेल्या रुबी चायनीज दुकानात येऊन फिर्यादीच्या ओळखीच्या लोकांनी मी फुकट चायनीज खाऊन बिल न देता निघून जातो असे का सांगितले म्हणून फिर्यादी यांच्या मालकाच्या अंगावर येऊन त्यांना हाताने मारहाण करत शिवीगाळ करून दमदाटी केली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रुपनर हे करीत आहेत.

# स्वेरीत ‘राष्ट्रीय युवा दिन’ साजरा

## स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांना केले विद्यार्थ्यांनी अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) च्या एम.बी.ए विभागाच्या वतीने ‘इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल’ अंतर्गत ‘राष्ट्रीय युवा दिन’ साजरा करण्यात आला तसेच स्वामी विवेकानंद यांची १६१ वी जयंती व राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांची ४२६ वी जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी बहुमोल विचार मांडले.




**स्वेरीत ‘राष्ट्रीय युवा दिन’ निमित्त स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन करताना प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर सोबत डावीकडून प्रा. ए. ए. अहमद, प्रा. पी. एस. मोरे, प्रा. एस. डी. सरीक, डॉ. के. पी. गलानी, डॉ. एन. एस. मगर, प्रा. के. पी. कोंडूभैरी, डॉ. एम. एम. भोरे आणि विद्यार्थिनी प्रतिनिधी.**

१९८४ मध्ये स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त भारत सरकारने १२ जानेवारी हा दिवस ’राष्ट्रीय युवा दिन’ म्हणून घोषित केला होता. तेंव्हापासून देशभरात दरवर्षी हा दिवस ‘राष्ट्रीय युवा दिवस’ म्हणून साजरा होऊ लागला. हा दिवस संपूर्ण भारतात शाळा आणि महाविद्यालयांमध्ये मिरवणूक, भाषण, संगीत, युवा संमेलन, चर्चासत्रे, सादरीकरण, निबंध-लेखन, पठण इत्यादी स्पर्धांसह साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद यांचे विचार व आदर्श प्रत्येक युवापिढींपर्यंत पोहोचवणे हा यामागील हेतू आहे. स्वेरीमध्ये ‘इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल’ तर्फे प्रत्येक वर्षी ‘राष्ट्रीय युवा दिवस’ हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. दीप प्रज्वलनानंतर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या प्रथम वर्षाचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर हे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त म्हणाले की, ‘युवाशक्तीची देशाला असणारी गरज आणि त्या माध्यमातून राष्ट्र विकासासाठी युवकांचे अतुलनीय योगदान आहे. युवकांनी मोबाईलच्या मोहजालातून बाहेर येत स्वतःमधील आव्हानांचा सकारात्मक पद्धतीने सामना करत संघर्ष करणे सध्या गरजेचे आहे. आजचा युवक हा व्यसनाधीन होत असून त्यातून त्यांनी लवकर बाहेर पडणे गरजेचे आहे.’ तसेच राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना डॉ. खेडकर म्हणाले की, ‘विद्यार्थीदशेपासून एक चांगली स्त्री म्हणून जीवनात व समाजात आपण वागले पाहिजे, आपल्या वागण्यातून आपल्या आई-वडिलांचे नाव उज्वल केले पाहिजे’ हे सांगताना त्यांनी राजमाता जिजाऊ साहेबांच्या इतिहासातील शौर्याचे अनेक दाखले दिले तसेच या कार्यक्रमात ‘इन्स्टिट्यूशन इनोव्हेशन कौन्सिल’चे प्रेसिडेंट प्रा. दिग्विजय डी. रोंगे, एमबीए विभागप्रमुख डॉ. के. पी. गलानी, ‘फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम’च्या समन्वयिका डॉ. एम. एम. भोरे, डॉ. एन. एस. मगर, प्रा. एस. डी. सरीक, प्रा. ए. ए. अहमद यांच्यासह इतर प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.के. पी. कोंडूभैरी यांनी केले तर आभार प्रा. पी.एस.मोरे यांनी मानले.

# डुबेरे जनता विद्यालयाध्ये छत्रपती शिवाजी महाराज फिरते वस्तू संग्रहालय विद्यार्थांच्या भेटीला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या सौजन्याने डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज फिरते वस्तुसंग्रहालय मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस डव्होकेट नितीन ठाकरे व संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने प्रदर्शनासाठी उपलब्ध झाले.




प्रदर्शनाचे उद्घाटन श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण शेठ वाजे यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर कारभारी वारुंगसे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे वस्तुसंग्रहालयाचे कर्मचारी लोकायत हलकारे,प्रताप पाटील, ऋतुजा काळे,कश्यपी राणे, शिवाजी टावरे,अमित पाले, ओंकार डोंगरकर,जेष्ठ शिक्षक दिंगबर जाधव आदी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी फिरते वस्तुसंग्रहालय बद्दल थोडक्यात माहिती देवून प्रास्ताविक केले.

यावेळी बोलताना श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण शेठ वाजे म्हणाले की, प्रदर्शने बनवताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांचा विचार केला आहे. बसमधील प्रदर्शने विद्यार्थ्यांच्या शालेय अभ्यासक्रमास पूरक ’ आहे . विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेऊन इतिहासाचा अभ्यास करताना उपयोग करावा असे आव्हान श्री वाजे यांनी केले.

वस्तुसंग्रहालयाचे प्रतिनिधी प्रताप पाटील यांनी या उपक्रमा बद्दल माहिती देताना ’सिटी-सी.एस. एम.व्ही.एस् फिरते वस्तुसंग्रहालय या उपक्रमाद्द्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यत पोहोचणे हा संग्रहालयाचा उद्देश आहे. यासाठी अत्याधुनिक साधनांनी युक्त बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. या बसेस शहरात विविध ठिकाणी, उपनगरांमध्ये तसेच ग्रामीण भागांतही नेल्या जातात ज्यामध्ये विविध विषयांवरील प्रदर्शने भरविली जातात.या बसेस वातानुकूलित असून त्यांमध्ये कलाकृतींच प्रर्शन करण्यासाठी आवश्यक अशा शोकेसेस, इंटरअक्टिव्ह डेमो किट्स, दृक-श्राव्य संसाधने आणि डिजिटल माध्यमयुक्त साधनेही उपलब्ध आहेत. लहान मुलांना आणि दर्शकांना या प्रदर्शनांचा लाभ घेता यावा यासाठी शाळेत हे प्रदर्शन आयोजित केले आहे. या बसची भेट आणि त्यासोबतचे सर्व उपक्रम पूर्णपणे विनामूल्य आहेत हे सांगितले.प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी इ.स.११वे शतकातील महिषासुरमर्दिनी, गणेश, ९ वे शतकातील बाहुबली, ९ व १० शतक शालभंजिका, असिरीया व शिल्पे, प्राचिन, इजिप्त व शिल्पे, प्राचिन ग्रीस,रोमन साम्राज्य, हर्मिसचा पाय,बारा ऑलिंपियन देव इ.सविस्तर माहितीच्या माध्यमातून बघुन समाधान व्यक्त करत उपक्रमाचे कौतुक केले.प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी पी.आर करपे, सोमनाथ गिरी, सुनिल ससाणे, डी.ए.रबडे,सोमनाथ पगार, राजेंद्र गांगुर्डे, कचेश्वर शिंदे,जयश्री गोहाड, किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने, ऋषीकेश कुंदे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती सर्व कार्यालयात साजरी करावी : संतोष सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची २३ जानेवारी जयंती दिवस सर्व कार्यालयात महाराष्ट्र शासनाच्या दि. २७ डिसेंबर २०२४ च्या परिपत्रकानुसार साजरी करावी ही मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी केली आहे.



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे देशाचे राष्ट्रपुरुष आहेत. त्यांना भारत सरकारने राष्ट्रपुरुष म्हणून घोषित केलेले आहे. राष्ट्रपुरुषाचा सन्मान महाराष्ट्रातील सर्व कार्यालयात होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रामध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे म्हणजे दैवत मानले जाते. त्यामुळे येणाऱ्या २३ जानेवारी रोजी त्यांची जयंती आहे. तरी ही जयंती सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात साजरी करावी. अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे लातूर जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे.

# समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे डॉक्टरांचा सत्कार व दिनदर्शिकेचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातर्फे काशी उज्जैन व श्रिशैल पिठाच्या ट्रस्टवर नेमणूक झाल्याबद्दल डॉ. शैलेश पाटील यांचा डॉ. जय सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे नुकतेच डॉक्टर पदवी प्राप्त वृषाली रोडगीकर , कांचन वांगी व नागनाथ म्हेत्रे यांचा सत्कार माजी खासदारांच्या हस्ते करण्यात आला अध्यक्षस्थानी डॉक्टर जय सिद्धेश्वर शिवाचार्य महाराज होते. याप्रसंगी दिनदर्शिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाला.



याप्रसंगी चंद्रकांत रमणशेट्टी डॉ. नागनाथ म्हेत्रे, डॉ.वृषाली रोडगीकर, डॉ. कांचन वांगी, डॉ. शैलेश पाटील, भीमराव गंगधरे व रोडगीकर यांनी मनोगत व्यक्त केले जय सिद्धेश्वर महाराज भाषणात म्हणाले ज्येष्ठांची उपक्रम उत्तम आहेत त्यांचे कार्य व ऊर्जा तरुणांना लाजवण्यासारखे आहे प्रार्थना विमल पवाडे, प्रास्ताविक बाबुराव नरुणे, आभार चंद्रकांत बिराजदार व सूत्रसंचालन अशोक खानापुरे यांनी केले.

याप्रसंगी मन्मथ कोनापुरे आप्पाराव विभूते शिवलिंग शहाबादे ववीरशैव प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर विजापुरे, सुरेश हत्ती, महादेव पाटील, माजी नगरसेवक अविनाश पाटील, अशोक म्हमाने, चंद्रप्रभू शहा शिवयोग धामचे भक्तगण व अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते व शेवटी तिळगुळ समारंभ झाला.

# काकासाहेबनगर महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान महाविद्यालय येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व बहिशाल मंडळ अंतर्गत डॉ. यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला घेण्यात आली. या व्याख्यानमालेचे उद्धाटन डॉ. स्वप्नील निर्मळ यांच्या हस्ते करण्यात आले. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प त्यांनी गुंफले. यावेळी त्यांनी ’स्व:त्वाची जाणीव’ या विषयावर मार्गदर्शन केले. व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प गुंफण्यासाठी हेमंत टिळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी ’हुतात्मा अनंत कान्हेरे’ या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी विचार



ऐकवले.

तर . विजयकुमार इंगळे यांच्या ’जीवन सुंदर आहे’ या व्याख्यानाने व्याख्यानमालेचा समारोप करण्यात आला. आपल्या जीवनात येणाऱ्या संकटावर मात करून जीवन आनंदी कसे करावे. हे वेगवेगळे उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

व्याख्यानमालेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. अतुल गवारे यांनी भूषविले.ते या प्रसंगी म्हणाले की विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर इतरही गोष्टींची माहिती व आवड निर्माण करण्यासाठी असे उपक्रम महाविद्यालयात विद्यापीठ अंतर्गत घेतले जातात. यातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येतो. म्हणून विद्यार्थ्यांनी अशा व्याख्यानमालाचा लाभ घ्यायलाच हवा.

या व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन कु. ऋतुजा मेधने आणि ऋतुजा आहेर या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र कार्यवाह डॉ. प्रतिभा बाहेकर यांनी केले. पाहुण्याचा परिचय बहि:शाल केंद्र सह-समन्वयक. प्रा.सुरभी दाणी यांनी केला. तर आभार प्रदर्शन कु. प्राजक्ता मंडलिक आणि कु. समृद्धी मत्सागर, यांनी केले.

या कार्यशाळेसाठी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व प्रध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपली उपस्थिती नोंदविली.

**महाराष्ट्राच्या लेकी राजमाता जिजाऊ पुरस्कारांने सन्मानित**

**राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन**

# शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनच्या वतीने खेळाडूंच्या मातांचा गौरव

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्ह्यातील विविध क्रीडा प्रकारात राष्ट्रीय पातळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा क्रीडा सह्याद्री व शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशन व निफाड इंग्लिश स्कूलच्या वतीने राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. निफाड शहरातील सरस्वती विद्यालयातील सभागृहात राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलालजी चोरडिया, निफाड इंग्लिश स्कुल चे मुख्याध्यापक अरुण महाजन व महाजन, सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती बागडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी अरूण महाजनतर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.मिलींद महाजन व . प्रज्ञा महाजन, BMC च्या देशातील पहिल्या महिला फायर ब्रिगेड च्या प्रमुख.लता गिते (भाबड), क्रीडा सह्याद्री व शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड, विनोद गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

**जिजाऊ तुम्ही नसता तर नसते घडले शिवराय शंभूछावा.. जिजाऊ तुम्ही नसता तर मिळाला स्वराज्याचा ठेवा.. जिजाऊ तुम्ही नसता तर नसते लढले जिद्दीने मावळे.. या युक्तीप्रमाणे आपणही आपल्या पाल्यास जिजाऊ मातेच्या प्रेरणेतून सुसंस्कार देऊन भारताचा एक चांगला नागरिक व खेळाडू बनवण्याची प्रेरणा दिली हे कार्य न विसरण्यासारखे आहे असा उल्लेख शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड यांनी आपल्या भाषणातून केले.**

या प्रसंगी राष्ट्रीय व राज्य खेळाडूंच्या आई कावेरी डोंगरे, ज्योती कुमावत, डॉ. प्रज्ञा महाजन, प्रज्ञा अमोल जाधव, मंगला नितीन बागुल, लता दिपक गिते ( भाबड), लता ठाकरे, पुष्पा सोनार, कल्पना हिरामण खताळे, सरिका दत्तात्रेय घोटेकर, उषा शंकर कवडे, मुक्ता विलास नागरे, सुभावती दिनेश यादव, रुपाली राजेश काकडे, सविता योगेश घोटेकर, ललिता योगश गाजरे, छाया प्रकाश पगार, सीमा सोन्याबापू गंभीरे, मंगल बद्रीनाथ गंभिरे, शुभांगी सुधीर काळे, सविता प्रवीण कोटकर, रेश्मा नवनाथ साबळे, रुबिना आलताब पठाण, वैशाली सचिन ससाणे, जयश्री प्रदिप शिंदे, रुकसाना लियाकत तांबोळी, रोहिणी प्रविण गोळे, मंगला विनोद गायकवाड, अर्चना संतोष गाडेकर, मनिषा सचिन पडोळ,जयश्री सुनील धुमाळ, सुषमा जितेंद्र कोचर, .मोनिका सुनील धुमाळ, कावेरी दशरथ शिंदे, शारदा अविनाश बिदे, चंद्रकला मच्छिन्द्र सालमुठे, .स्वाती चव्हाण, .विद्या जाधव यांचा फेटे बांधून मानपत्र व सन्मानचिन्ह




देऊन गौरव करण्यात आला. शाळा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये पदके मिळवणाऱ्या तसेच सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा गौरव नेहमीच केला जातो. शिवाय या खेळाडूंना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांचाही सन्मान केला जातो मात्र. क्रीडा सह्याद्री व शिव अविष्कार स्पोर्ट्सफाउंडेशनने पुढाकार घेऊन प्रथमच खेळाडूंच्या मातांचा राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२५ देऊन गौरव केला.

याक्षणी पुरस्कार स्वीकारतांना आईच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळतांना दिसले. या कार्यक्रमप्रसंगी श्रीम. निलम बेंडकुळे यांनी सूत्रसंचालन केले व श्री. विलास गायकवाड यांनी आभार मानले.